N.A.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दुरध्वनी : २६५५६७९९, फॅक्स : २६५५६८०५, इमेल : collectormsd@gmail.com

परिशिष्ट "ब"

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-ब मधील तरतुदी अन्वये नियोजन प्राधिकरणाने बांधकाम / विकास परवानगी दिली आहे, अशा जमिनीच्या भोगवटादारास द्यावयाच्या सनदेचा नमुना.

मौजे-घाटकोपर-किरोळ, तालुका-कुर्ला येथील सर्वे क्र./हि.नं.२२१/२पै, २२१/६, २२२/१पै., २२२/२, २२३/१, २२३/२, २२२/४, २२६/२ व २२६/७ अ.भू.क्र.२७४अ (न.भू.क्र.५८०८) क्षेत्र निवासी ६२३२.५९ चौ.मी. व वाणिज्यीक ९९.४५ चौ.मी. या जमिनीच्या भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-ब च्या तदतुर्दीन्वये निवासी व वाणिज्यीक प्रयोजनासाठी सदर जमिनीचा विकास करण्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या नियोजन प्राधिकरणाच्या क्र.एसआरए/इएनजी/६९२/एन/एमएल/एल्एव्हाय, दिनांक १३/०४/२०१७ अन्वये बांधकाम परवानगी प्राप्त केली आहे, ज्यासंबंधी नियोजन प्राधिकरणाने मंजूर केलेला नकाशा या सनदे सोबत संलग्न आहे.

ज्याअर्थी उक्त जमिनीच्या भोगवटादाराने शासनाला, उक्त संहितेच्या कलम ४२-ब नुसार देय रुपांतरण कराची रु.२,८२,४६५/-, दंडाची रक्कम रु.११,२९,८६०/- व अकृषिक कर (सन २०१७ ते २०१९) रक्कम रु.१,१२,९८६/- अशी एकूण रक्कम रुपये १५,२५,३११/- एवढी रक्कम एचडीएफसी बँक या बँकेचा धनादेश क्रमांक ०२७२१९, ०२७२२० व ०२७२१८, दिनांक १८/०२/२०१९ रोजी शासनास भरणा केलेली असून त्याबाबतची चलनाची प्रत सादर केलेली आहे.

त्याअर्थी आता, उक्त संहितेमधील तरतुदीच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींना आणि खालील शर्तींना अधीन राहून उपरोक्त जमिनीच्या भोगवटादारास सदर नियोजन प्राधिकाऱ्याच्या वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने सदर जमिनीवर अनुज्ञेय करण्यात आलेल्या अकृषिक वापरापोटी उक्त संहितेच्या कलम ४२-ब अन्वये ही सनद देण्यात येत आहे.

१) आकारणी : उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीच्या संबंधात या अगोदर वसुली योग्य असलेल्या आकारणी ऐवजी वर उल्लेखित विकास / बांधकाम परवानगी प्राप्त झाल्यापासून दिनांक ३१ जुलै रोजी संपणाऱ्या हमीच्या कालावधीत शासनाला उपरोक्त क्षेत्रासाठी **प्रत्येक वर्षी रु.५६,४९३/- (अक्षरी रुपये छप्पन्न हजार चारशे त्र्याण्णव)** निवासी रु.८.६५/- व वाणिज्यीक रु.२५.९५/- प्रती चौ.मी. या दराने परिगणित होणारी वार्षिक आकारणी देईल आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, उक्त संहिते अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून, वेळोवेळी निश्चित करण्यात येईल, अशी सुधारित आकारणी देईल.

२) उक्त जमिनीचा भोगवटादार उक्त जमिनीवर वसुली योग्य असलेले सर्व कर, दर आणि उपकर शासनास व संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडे भरणा करील.

३) वरीलप्रमाणे मंजूर केलेल्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये नियोजन प्राधिकरणाच्या पुर्व मंजूरी शिवाय कोणताही बदल करु नये व ही सनद निर्गमित झाल्यानंतर नियोजन प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने सदर जमिनीच्या वापरामध्ये किंवा वापराच्या क्षेत्रामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती, असा बदल नियोजन प्राधिकरणाकडून मंजूर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी यांना देणे भोगवटादारावर बंधनकारक राहील.

४) उक्त जमिनीच्या भोगवटादाराने पूर्वगामी शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जिल्हाधिकाऱ्यास, उक्त संहितेच्या आणि तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींअन्वये जी भरण्यास उपयोगकर्ता दायी असेल अशी इतर कोणत्याही शास्तीस बाधा न आणता त्यास योग्य वाटेल अशी आकारणी भरल्यावर आणि कलम ३२९ च्या पोट कलम (२) च्या अधीनतेने, त्यास योग्य वाटेल एवढा दंड भरल्यावर उक्त जमीन भोगवटादार याच्या वहिवाटीत असण्याचे चालू ठेवता येईल.

५) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२-ब मधील तरतुदी अन्वये सदरची सनद देण्यात येत असली तरी, सदर सनदेत नमुद केलेली मिळकत भविष्यात भोगवटादार वर्ग-दोन या धारणाधिकाराची असल्याचे निष्पन्न झाल्यास त्यासाठी प्रचलित तरतुदी विचारात घेतल्यानंतर शासनाकडे नियमानुसार देय असणारी नजराण्याची व शासनास देय असलेली अन्य रक्कम विहित कार्यपध्दती अवलंबून संबंधीत महसूल प्राधिकाऱ्याने मागणी केल्यास सदर रकमा शासनास जमा करणे ही संबंधित भोगवटादाराची जबाबदारी राहील आणि हे संबंधित भोगवटादारास मान्य आहे, असे संबंधित भोगवटादार यांनी हमीपत्र सादर करावे.

६) प्रस्तुतची सनद म्हणजे जमिनीचे मालकी हक्काचा पुरावा नाही. सदरची सनद नियोजन प्राधिकरणाने दिलेल्या विकास आराखडयातील अभिप्राय / बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२-ब मधील तरतुदीनुसार निर्गमित केलेली आहे.

त्याची साक्ष म्हणून जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी या ठिकाणी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुध्दा दिनांक १६/०३/२०१९ रोजी त्याची स्वाक्षरी येथे केलेली आहे.

क्रमांक : सी/कार्या-२डी/जमीन/सनद एसआरके-२२४५
दिनांक : १६/०३/२०१९

(राजेंद्र बोरकर)
निवासी उपजिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे

(भोगवटादाराचे नाव)
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
स्वाक्षरी करणार :

अर्जदार : श्री. नैनेश के. शाह संचालक, मनी मेगनम नेस्ट प्रा.लि.

आम्ही खाली नावे नमुद केलेले साक्षीदार जाहीर करतो की, ज्याने या सनदेवर स्वाक्षरी केलेली आहे ते श्री. नैनेश के. शाह संचालक, मनी मगनम नेस्ट प्रा.लि. ही व्यक्ती, तीच व्यक्ती आहे आणि त्याने या ठिकाणी आमच्या समक्ष त्याची स्वाक्षरी केलेली आहे.

(साक्षीदारांची नावे व स्वाक्षरी)

PAN - AYMPS0666C

AEOPB8121K

प्रत :

१) तहसिलदार कुर्ला / नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२) कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३) तलाठी सजा घाटकोपर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

४) श्री. नैनेश के. शाह संचालक, मनी मेगनम नेस्ट प्रा.लि., गोदरेज कोलीसियम, ए विंग, १३०१, १३ वा मजला, इव्हर्ड रोडच्या बाजूला, पुर्व द्रुतगती महामार्गासमोर, सायन (पूर्व), मुंबई-४०० ०२२

५) निवड नस्ती.